SWEDEN EXCHANGE PROGRAMME 2016 - 17
INTERVIEW WITH CHIEF MINISTER PUBLISHED
ON "GOANVARTA", 1ST DEC. 2016

# स्वीडनच्या विद्यार्थ्यांनी घेतली मुख्यमंत्र्यांची भेट

## मडगावातील चौगुले कॉलेजचा विद्यार्थी समाज आंतरराष्ट्रीय देवाणघेवाण कार्यक्रम



स्वीडन येथील शैक्षणिक संस्थेच्या विद्यार्थ्यांसह मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर व मान्यवर.

**पणजी** : मडगाव येथील श्रीमती पार्वतीबाई चौगुले कला व विज्ञान महाविद्यालयातर्फे विद्यार्थी समाज आंतरराष्ट्रीय देवाणघेबाण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाअंतर्गत गोव्याला भेट दिलेल्या स्वीडन येथील टुलिंग जिमनॅशियम आणि ब्रोमा जिमनॅशियम या दोन शैक्षणिक संस्थेच्या विद्यार्थ्यांनी पर्वरी यथे सचिवालयातील परिषदगृहात मुख्यमंत्री लक्ष्मीकांत पार्सेकर यांची भेट घेऊन चर्चा केली.

मुख्यमंत्री पार्सेकर म्हणाले, शिक्षण हे केवळ नोकरी मिळविण्यासाठी नाही. याचा आपण स्वीकार केला पाहिजे. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारत सरकार विकास कौशल्यावर भर देत आहे. विकास कौशल्यासंबंधी देशात स्वतंत्र केंद्रीय मंत्रालय आहे. या योजनेखाली राज्यातील युवकांना व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक साहाय्य उपलब्ध करण्यात येते. उच्च माध्यमिकपर्यंत सरकार मोफत शिक्षण उपलब्ध करीत आहे. गोव्यातील लोक पर्यावरणासंबंधी संवेदनशील असल्याने यावर्षी ५ हेक्टर वनामध्ये वाढ झाली आहे. सरकारने काही कायदेशीर खाणींना परवानगी दिल्याचेही त्यांनी सांगितले.

मडगाव येथील श्रीमती पार्वतीबाई चौगुले कला आणि विज्ञान महाविद्यालयाच्या समाज देवाणघेवाण कार्यक्रमात २०१० पासून स्वीडन येथील पाच शैक्षणिक संस्थांचे विद्यार्थी सहभागी होत आहेत. या कार्यक्रमामुळे ज्ञानाचा प्रसार होण्यास अनुभवांची देवाण-घेवाण करण्यास आणि व्यावसायिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यास मदत होते.

या कार्यक्रमात दोन संस्थांमधून १८ विद्यार्थी आणि ६ सदस्य सहभागी झाले आहेत. यावेळी उच्च शिक्षण संचालक भास्कर नायक, श्रीमती पार्वतीबाई चौगुले महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. एन. सावंत, सचिन मोराईस, माधुरी मोटेकर, शर्मिला मिनेझीस आणि इतर उपस्थित होते.